# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२५

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

## राज्यातील विनाअनुदानित औद्योगिक प्रशिक्षण संस्थाना (आय.टी.आय.) अनुदान मिळणेबाबत

**(१) ४७३ (२४-०४-२०२५) श्री.जयंत आसगावकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.एकनाथराव खडसे, श्री.किशोर दराडे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी शिक्षण संस्थामार्फत शेकडो अशासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था चालविण्यात येत असून सदर संस्थाना अनुदान देण्यात येत नसल्यामुळे कर्मचाऱ्यांचे वेतन देणे शक्य होत नसून या विनाअनुदान तत्त्वावरील आय.टी.आय सोडून उर्वरीत विद्याशाखांना अनुदान देण्यात आले असून सन २००८ - २००९ पासून आय.टी.आय ना अनुदान देणेबाबत प्रस्ताव तयार करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १७ जुलै, २०१८ रोजी मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे दालनात बैठक घेऊन प्रस्ताव दोन महिन्यांच्या आत मंत्रिमंडळासमोर सादर करणेबाबत आदेश देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त प्रस्तावानुसार अशासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थाना अनुदान उपलब्ध करून देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा (०४-०७-२०२५) :** (१) हे खरे नाही.

सन २००८-०९ पासून खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना अनुदान देणेबाबत प्रस्ताव शासनस्तरावर तयार करण्यात आला नाही.

(२) हे खरे आहे.

(३) खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना वेतन अनुदान देण्याऐवजी त्यांना वेतनाकरीता लागणारा खर्च, यंत्रसामुग्री व साधनसामुग्री करीता आलेला खर्च व संस्था चालवण्याकरीता लागणारा खर्च भागविण्याकरीता व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांकरीता विद्यार्थ्यांकडून प्राप्त होणारे प्रशिक्षण शुल्क हे उत्पन्नाचे एकमेव साधन आहे. त्यास अनुसरुन व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेस दिनांक २९ मे, २०१९ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. खाजगी संस्थेत प्रवेश घेण्यासाठी प्रशिक्षणार्थ्यांना प्रोत्साहन देण्यात येवून खाजगी संस्थांना प्रशिक्षण शुल्काच्या माध्यमातून संस्थेचा खर्च भागविणे शक्य व्हावे असा योजनेचा उद्देश आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात जिल्हा परिषद शिक्षकांकरीता आंतरजिल्हा बदली टप्पा-७ सूरु करण्याबाबत

**(२) ६२० (२४-०४-२०२५) श्री.धीरज लिंगाडे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सत्यजीत तांबे, श्री.जगन्नाथ अभ्यंकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील जिल्हा परिषद शाळांमधील हजारो शिक्षक हे इतर जिल्ह्यात मागील अनेक वर्षांपासून नोकरी करीत आहेत तसेच अनेक पती-पत्नी शिक्षक हे वेगवेगळया जिल्ह्यात सेवा देत असल्याने त्यांना विभक्त जीवन जगावे लागत असून त्यांच्या मुलांच्या शैक्षणिक अडचणी निर्माण होत आहेत तसेच आई-वडीलांच्या आजारपणाकडे लक्ष देता येत नाही. अशा अनेक अडचणी त्यांचा समोर येत असल्याने स्वगृही येण्यासाठी आंतर जिल्हा बदली टप्पा- ७ सुरु करावा अशी मागणी त्यांच्याकडून वारंवार प्रशासनाला होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०२४ मध्ये लोकसभा व विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहिता व इतर कामामुळे शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदल्या झाल्या नसून सन २०२५ मध्ये राष्ट्रीय जनगणना व शिक्षक भरतीचा दुसरा टप्पा राबविणे शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नवीन शिक्षक भरती केल्यास अंतर जिल्हा बदलीने येणाऱ्या शिक्षकांच्या रिक्त पदांवर नवीन शिक्षकांची भरती होणार असल्याने १८ ते २२ वर्षांपासून बदलीच्या प्रतीक्षेत असणाऱ्या शिक्षकांवर अन्याय होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय
(४) असल्यास, दिनांक २१ जून, २०२३ च्या शासन निर्णयाद्वारे स्थानिक स्वराज्य संस्थेतील रिक्त जागा पोर्टलद्वारे भरण्यापूर्वी कार्यरत शिक्षकांच्या जिल्हांतर्गत बदल्या समुपदेशाने कराव्यात असे शासनाचे आदेश असतानाही काही जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विनंतीवरून बदली मागणाऱ्या शिक्षकांच्या जिल्हांतर्गत बदल्या केल्या नाहीत, अशा तक्रारी शासनास प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, अशा शिक्षकांना स्वगृही येण्यासाठी आंतर जिल्हा बदली टप्पा-७ राबविण्याबाबत व शिक्षक भरतीचा दुसरा टप्पा राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे (२६-०६-२०२५) :** (१), (२), (३) (४) व (५) राज्यातील जिल्हा परिषदेअंतर्गत शाळांमधील कार्यरत शिक्षक संवर्गाच्या आंतरजिल्हा बदलीबाबत शासनाने दिनांक २३/०५/२०२३

रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित केलेल्या सुधारित धोरणातील तरतुदीनुसार ऑनलाईन आंतरजिल्हा बदली सन २०२४-२५ राबविण्याकरीता शासनाच्या दिनांक २८/०२/२०२५ रोजीच्या पत्रान्वये वेळापत्रक निश्चित केले आहे. सदर वेळापत्रकानुसार ऑनलाईन आंतरजिल्हा बदलीची कार्यवाही सुरु आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जालना जिल्ह्यातील मोसंबी उत्पादकांना आर्थिक मदत देणेबाबत

**(३) ७०६ (०९-०४-२०२५) श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील मराठवाडा विभागासह विशेषतः जालना जिल्ह्यात मागील दोन ते तीन वर्षांपासून हवामानातील सातत्यपूर्ण बदल, दुष्काळी स्थिती आणि बाजारात मोसंबीला मिळणारा कमी भाव यामुळे मोसंबीच्या बागांमध्ये फळगळती होत असून त्यामुळे मोसंबीच्या बागा नामशेष होण्याच्या मार्गावर असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ च्या चौथ्या आठवड्यात सप्ताहात वा दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मराठवाडा विभागासह जालना जिल्ह्यात शेतकऱ्यांना झालेल्या आर्थिक नुकसानीसाठी शासनामार्फत नुकसानभरपाई देण्याबाबत तसेच मोसंबी पिकांचे संवर्धन व या क्षेत्राचे संरक्षण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मकरंद जाधव (पाटील)(०३-०७-२०२५) :** (१) व (२) जालना जिल्ह्यामध्ये माहे सप्टेंबर, २०२४ ते माहे डिसेंबर, २०२४ अखेरीस हवामान बदल अतिवृष्टी व अवेळी पाऊस इत्यादीमुळे सर्वपिकाचे व मोसंबी फळपिकांचे झालेल्या नुकसानीबाबत संयुक्त पंचनामे करुन, सर्व पिकांचे बाधित एकूण क्षेत्र २,५५,५१९ हेक्टर असून मोसंबी फळपिकाचे २९५३८ हेक्टर क्षेत्राचे नुकसान आढळून आलेले होते. त्याबाबत शासनास अहवाल सादर केला होता.त्यानुसार शासन निर्णय दिनांक १० डिसेंबर, २०२४ नुसार ४१२.३० कोटी निधी उपलब्ध करुन दिलेला असून सदर निधीपैकी ३३३ कोटी निधी पात्र लाभार्थी यांचे खात्यामध्ये वितरणास जिल्हाधिकारी जालना यांचे स्तरावरुन मंजूरी देण्यात आलेली आहे. व उर्वरित पात्र लाभार्थी यांच्या याद्या अपलोड करण्याची कार्यवाही तहसिलदार यांचे स्तरावर सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पैठण ते छत्रपती संभाजीनगर या मुख्य शहरांना जोडणाऱ्या राज्य मार्गाच्या कामास शासनाने मंजुरी दिल्याबाबत

**(४) ७८० (१७-०४-२०२५) श्री.विक्रम काळे, श्री.सत्यजीत तांबे, श्री.सतिश चव्हाण, श्री.जयंत आसगावकर : तारांकित प्रश्न क्रमांक १९८४१ ला दिनांक १८ जुलै, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

वि.प. ९ (४)

(१) छत्रपती संभाजीनगर ते पैठण तसेच छत्रपती संभाजीनगर ते वाळूज महानगर आणि छत्रपती संभाजीनगर ते दौलताबाद टी पॉईंट पर्यंतच्या राज्य मार्गाच्या चौपदरीकरणाला शासनाने मंजूरी दिली असून पैठण ते छत्रपती संभाजीनगर या महामार्गाचे काम केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारीत असून सदर रस्त्याचे सविस्तर प्रकल्प अहवाल मंजूर झाले असून यामध्ये अतिरिक्त भूसंपादन न करता अस्तित्वातील ३० मीटर जागेत चौपदरीकरण करण्याचे काम प्रस्तावित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, छत्रपती संभाजीनगर ते वाळूज महानगर आणि छत्रपती संभाजीनगर ते दौलताबाद टी पॉईंट पर्यंतच्या राज्य मार्गाच्या चौपदरीकरण करण्याच्या कामाला गती मिळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,
(३) असल्यास, केंद्र शासनाकडून सदर महामार्गाचे कामास माहे जानेवारी, २०२३ मध्ये कार्यारंभ आदेश देण्यात आले असून करारनाम्यानुसार काम पूर्णत्वाचा कालावधी कार्यारंभ दिनांकापासून १८ महिन्यांचा असून सदर कामाची सद्य:स्थिती काय आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने छत्रपती संभाजीनगर ते पैठण तसेच छत्रपती संभाजीनगर ते वाळूज महानगर आणि छत्रपती संभाजीनगर ते दौलताबाद टी पॉईंट पर्यंतच्या रस्त्याचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच सदर रस्त्याच्या कामाचे स्वरुप काय आहे व सदरहू काम किती कालावधीत पूर्ण होणे अपेक्षित आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (०२-०७-२०२५) :** (१) हे खरे आहे,

छत्रपती संभाजीनगर ते पैठण हा रस्ता राष्ट्रीय महामार्ग क्र.७५२-E असून भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत काम प्रगतीपथावर आहे. छत्रपती संभाजीनगर ते वाळूंज महानगर हा रस्ता राष्ट्रीय महामार्ग क्र.७५३-F असून हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे आहे. या रस्त्यावरती BOT तत्वावर कामपूर्ण झालेले आहे.

छत्रपती संभाजीनगर ते दौलताबाद हा रस्ता राज्यमार्ग क्र.१६ सार्वजनिक बांधकाम विभागाकडे असून रुपये २०० कोटीचे काम मंजूर असून ते निविदास्तरावर आहे.
(२) छत्रपती संभाजीनगर (नाका) ते वाळूंज हा रस्ता ०४ कि.मी. लांबीमध्ये ६ पदरी व १.५० कि.मी. लांबीमध्ये ४ पदरी आहे व काम पूर्ण झालेले आहे.

छत्रपती संभाजीनगर ते दौलताबाद टी पॉईंट हा रस्ता ४ पदरी मंजूर असून रुपये २०० कोटीचे कामाची निविदा राबविताना मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. त्यावर मा.न्यायालयाने निविदा प्रक्रियेवर स्थगिती दिली होती. आता सदर याचिका मा.उच्च न्यायालयाने खारिज केल्यामुळे निविदा विषयक उर्वरित बाबी पूर्ण करण्यात आल्या असून निविदा स्वीकृती /कार्यारंभ आदेश स्तरावर आहे.
(३), (४) व (५) छत्रपती संभाजीनगर ते पैठण या महामार्गालगत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या कार्यालयामार्फत छत्रपती संभाजीनगर शहरासाठी आवश्यक असलेली २५०० मीमी व्यासाची जलवाहिनी अंथरण्याचे काम देखील महामार्गाच्या ३० मीटर रूंदीत सुरू आहे. सदरील काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा मार्फत अत्यंत धिम्यागतीने होत असल्याने त्याचा परिणाम इकडील कार्यालयाकडुन करण्यात येणाऱ्या चौपदरीकरणाच्या कामात होत आहे. तसेच सदरील प्रकल्प पूर्णत्वास विलंब झालेला आहे.

सद्य:स्थितीत छत्रपती संभाजीनगर ते पैठण राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७५२E च्या चौपदरीकरणाची प्रगती एकूण ८८% इतकी असून, प्रकल्पाचे चौपदरीकरण त्वरित पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

## राज्यातील अखिल भारतीय आयुष पदव्युत्तर प्रवेश परिक्षेच्या नियमावलीत बदल करण्याबाबत

**(५) ८२६ (२४-०४-२०२५) श्री.श्रीकांत भारतीय : तारांकित प्रश्न क्रमांक २१९०० ला दिनांक ८ डिसेंबर, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आयुर्वेदातील एम.डी. व एम.एस. यासाठी "नीट" च्या धर्तीवर देशामध्ये अखिल भारतीय आयुष पदव्युत्तर प्रवेश परीक्षा (ए.आय.ए.पी.जी.ई.टी.) ही स्वतंत्र परीक्षा घेतली जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू परीक्षा केंद्र शासनाच्या अखत्यारीत असली तरी या प्रवेशासाठी देशाचा व राज्याचा असे दोन भाग करण्यात आलेले असून यातील राज्याच्या भागाची नियमावली राज्य शासन निश्चित करीत असते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांनी नीट च्या माध्यमातून महाराष्ट्राबाहेरील राज्यांमधील आयुर्वेद महाविद्यालयातून बी.ए.एम.एस. ची पदवी घेतली असल्यास त्यांना आपल्या राज्यातील ८५% राज्य कोट्यातील प्रवेश नाकारण्यात येत असल्यामुळे सदर विद्यार्थ्यांवर अन्याय होत असल्याची भावना निर्माण होत असून यासदंर्भात राज्य सरकार ८५% कोट्यातील नियमावलीत बदल करण्याची मागणी शासनाकडे सातत्याने करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने या प्रकरणी उक्त नियमात बदल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, त्याचा तपशील काय आहे, नसल्यास त्याची कारणे काय आहेत व याबाबतची शासनची नेमकी भूमिका काय आहे ?

**श्री.हसन मुश्रीफ (०२-०७-२०२५) :** (१) होय.

भारतीय चिकित्सा केंद्रीय परिषद, नवी दिल्ली यांनी दिनांक ०७/१२/२०१८ रोजीच्या अधिसूचनेन्वये, आयुर्वेद पदव्युत्तर विद्यार्थी प्रवेशासाठी AIAPGET ही सामाईक प्रवेश परीक्षा विहित केली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

महाराष्ट्रातील मूळ रहिवासी असलेल्या परंतु राज्याबाहेरुन आयुर्वेद पदवी शिक्षण पूर्ण केलेल्या काही विद्यार्थ्यांनी राज्य कोट्यातून आयुर्वेद पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी पात्र ठरण्याच्या अनुषंगाने नियमात बदल करण्याची मागणी शासनाकडे केली होती.

(४) व (५) शैक्षणिक वर्ष २०२४-२५ च्या आयुर्वेद पदव्युत्तर अभ्यासक्रम विद्यार्थी प्रवेश नियमावलीमध्ये सुधारणा करण्यात आलेली आहे. सदर सुधारणेनुसार मूळत: महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असलेले परंतु अन्य राज्यातून आयुर्वेद पदवी अभ्यासक्रम उत्तीर्ण विद्यार्थ्यांना आयुर्वेद पदव्युत्तर पदवी शिक्षणासाठी/ प्रवेशासाठी शासकीय व शासन अनुदानित महाविद्यालयातील ८५ टक्के राज्य कोट्यातून तसेच खाजगी

विनाअनुदानित महाविद्यालयातील ७० टक्के राज्य कोट्यातून प्रवेश घेण्यासाठी संबंधित अभ्यासक्रमाच्या नियम पुस्तिकेतील नियम क्र/०२/३ अन्वये पात्र ठरविण्यात आले आहे. तसेच सदर पात्र उमेदवारांना आयुर्वेद पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रियेत राज्यातील घटनात्मक आरक्षणाचा लाभ देखील लागू करण्यात आलेला आहे.

---

## राज्यात विशेषत: कोकणातील काजूवरील प्रक्रियेसाठी शेतकऱ्यांना वर्कींग कॅपिटल वाढवून देण्याबाबत

**(६) ९३९ (०९-०४-२०२५) श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: कोकणात उत्पादीत होणाऱ्या काजू पिकावर शेतकरी स्वतः प्रक्रिया करीत असेल तर डीआयसी / खादी ग्रामोद्योगाकडून ३५ टक्के अनुदान देण्यात येत असून सदर अनुदानापैकी ३० टक्के वर्कींग कॅपिटल तर ७० टक्के फिक्स कॅपिटल देण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे ३० टक्के वर्कींग कॅपिटल वाढवून ४५ टक्के देण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (०४-०७-२०२५) :** (१) होय.

राज्य शासनाच्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (CMEGP) या योजनेतंर्गत सेवा उद्योग व कृषी पूरक उपक्रमासाठी तसेच उत्पादन प्रकारातील उपक्रमासाठी प्रकल्प किमती अंतर्गत खेळत्या भांडवलाची (वर्कींग कॅपिटल) मर्यादा ही प्रकल्प खर्चाच्या ३० टक्के इतकी होती. त्यामध्ये दिनांक २१/०५/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारणा करण्यात आली आहे.

तसेच केंद्र शासनाच्या पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम (PMEGP) या योजनेंतर्गत खेळत्या भांडवलाची (वर्कींग कॅपिटल) मर्यादा ही प्रकल्प किंमतीच्या ४० टक्के इतकी आहे.

(२) दिनांक २१/५/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (CMEGP) या योजनेतंर्गत खेळत्या भांडवलाची (वर्कींग कॅपिटल) मर्यादा सुधारित करण्यात आली असून ती सेवा उद्योग व कृषी पूरक उपक्रमासाठी प्रकल्प खर्चाच्या ६० टक्के तसेच उत्पादन प्रकारातील उपक्रमासाठी प्रकल्प खर्चाच्या ४० टक्के अशी निश्चित करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही

---

## सोलापुर जिल्ह्यात स्वस्त धान्य दुकानात साखर उपलब्ध होत नसल्याबाबत

**(७) ९४४ (२४-०४-२०२५) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापुर जिल्ह्यात ५०,३०० अंत्योदय शिधापत्रिकाधारक असून त्यांना स्वस्त धान्य दुकानांच्या माध्यमातुन सवलतीच्या दरात धान्य उपलब्ध करुन दिले जात असल्याचे माहे डिसेबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे एप्रिल, २०२४ पासून ५०,३०० अंत्योदय शिधापत्रिकाधारक सवलतीच्या दरात मिळणाऱ्या साखरेपासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने अंत्योदय शिधापत्रिकाधारकांना स्वस्त धान्य दुकानात साखर मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ (०३-०७-२०२५) :** (१) हे खरे नाही.

सोलापूर जिल्ह्यात ५१,२५१ अंत्योदय शिधापत्रिकाधारक असून शिधापत्रिकाधारकांना स्वस्त धान्य दुकानांच्या माध्यमातून माहे जानेवारी २०२३ पासून मोफत धान्य गहू व तांदूळ शासनाचे आदेशानुसार वितरीत केले जाते आहे.
(२) व (३) हे खरे आहे.

अंत्योदय योजनेच्या लाभार्थ्यांना साखर वेळेत वाटप करण्याच्या अनुषंगाने माहे मार्च, २०२५ ते जून, २०२५ या कालावधीसाठी जिल्हानिहाय आवश्यक साखरेची मागणी प्राप्त करून घेण्याची कार्यवाही सुरू आहे. सदरची माहिती प्राप्त झाल्यानंतर तात्काळ साखर खरेदीची कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौजे सायले (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) येथील जलजीवन मिशन योजनेतंर्गत कामे अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(८) १३०९ (२४-०४-२०२५) श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे सायले (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) ग्रामपंचायत क्षेत्रातील जलजीवन मिशन योजनेची कामे पूर्ण करण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी माहे नोव्हेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सायले ग्रामपंचायत क्षेत्रातील बौध्दवाडी सार्वजनिक पाणीपुरवठा करण्यासाठी बांधण्यात आलेल्या बंधाऱ्यांची उंची वाढवण्यात न आल्याने तसेच लोखंडी दरवाजे तात्काळ लावण्यात न आल्याने पाण्याची पातळी कमी होऊन पाण्याची समस्या निर्माण होण्याच्या मार्गावर आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सद्य:स्थितीमध्ये पाण्याचे दुर्भिक्ष वाढल्याने शासनाने उक्त जलजीवन योजनेतंर्गतची कामे पूर्ण करुन पाणीपुरवठा करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.गुलाबराव पाटील (२७-०६-२०२५) :** (१) हे खरे नाही.
(२) अंशतः खरे आहे.

सायले बौध्दवाडी येथील नळ पाणीपुरवठा योजनेचे काम पूर्ण झाले असून, सदर योजनेत उर्ध्ववाहिनी, आर.सी.सी. साठवण टाकी, वितरण वाहिनी, आर.सी.सी. बंधारा या कामांच्या समावेश होता.

या योजनेद्वारे बौध्दवाडीला सुरळीत पाणीपुरवठा सुरू आहे. बौध्दवाडी नळ पाणीपुरवठा योजनेसाठी बांधण्यात आलेल्या बंधाऱ्याचे बांधकाम हे स्त्रोत बळकटीकरणाकरीता करण्यात आले आहे. सदर बंधारा स्त्रोत बळकटीकरणाकरीता असल्याने अधिक उंचीची आवश्यकता नाही. तसेच सदर बंधाऱ्यामुळे विहिरीची पाणी पातळी वाढण्यास मदत झाली आहे. त्यामुळे २०२५ च्या उन्हाळयात सदर बौध्दवाडीला पाणी तुटवडा जाणवला नाही. सदर बंधाऱ्याचे दरवाजे तयार असून सप्टेंबर अखेरीस पाऊस कमी झाल्यानंतर बसविण्याचे नियोजित आहे.

(३) सद्य:स्थितीमध्ये गावास अस्तित्वातील उद्भवावरून पाणीपुरवठा सुरू आहे. तसेच योजनेतील तांत्रिक बदलाच्या अनुषंगाने सुधारित अंदाजपत्रकास तांत्रिक मंजुरी देण्यात आलेली असून सदर प्रस्ताव सुधारीत प्रशासकीय मंजुरीकरीता शासनास सादर करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील वाहनधारकांना फास्ट टॅग बंधनकारक करण्यात आल्याबाबत

**(९) १३४३ (१७-०४-२०२५) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने दिनांक १ एप्रिल, २०२५ रोजी पासून वाहनधारकांना त्यांच्या वाहनांना फास्ट टॅग बंधनकारक केल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ च्या दुसऱ्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, फास्ट टॅग हा टोल वसुलीसाठी सुरक्षित असल्याची तपासणी शासनाने केली आहे काय,

(३) असल्यास, एखाद्या गाडीची बनावट नंबर प्लेट वापरून प्रवास केला तरीही ज्या मालकाचे मूळ वाहन आहे त्यांना टोल भरावा लागत असल्याचा प्रकार पुण्यातील पाटस टोल नाक्यावर (जि.पुणे) घडला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सर्व गाड्यांना फास्ट टॅग बंधनकारक करताना कोणतेही अनुचित प्रकार होऊ नयेत याकरीता फास्ट टॅग कंपनीकडे आणि शासनाकडे यंत्रणा असल्यास त्याचे प्रात्यक्षिक सर्वसामान्य वाहनधारकांना आणि जनतेला दाखवूनच फास्ट टॅग बंधनकारक करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (०४-०७-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) केंद्र शासनाच्या रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने (MoRTH) भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI) अंतर्गत प्रकल्पावरील पथक स्थानकावर National Toll Collection कार्यक्रमांतर्गत FASTag प्रणाली लागू केली आहे. सदर प्रणालीचा उद्देश पथकर वसूली रोख ऐवजी डिजिटाइज पध्दतीने करणे, वेगवान प्रणाली, पथकरातून जमा रक्कमेचा तपशील संगणकीय प्रणालीवर तात्काळ उपलब्ध असणे, एकंदरीत पथक वसूलीमध्ये पारदर्शकता वाढविणे असा आहे. केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्याच्या अखत्यारीतील खाजगीकरणांतर्गत प्रकल्पावर National Toll Collection कार्यक्रमांतर्ग FASTag प्रणाली लागू करण्याचे निर्देश क्षेत्रिय कार्यालयास देण्यात आले आहेत.

(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मंठा (जि.जालना) तालुक्यातील चौफुली ते तळणी फाटा दरम्यान अपघातांचे प्रमाण वाढत असल्याबाबत

**(१०) १६८८ (१७-०४-२०२५) श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंठा (जि.जालना) तालुक्यातील चौफुली ते तळणी फाटा दरम्यान एकही गतिरोधक नसल्यामुळे तसेच हायवेवरील पथदिवे बंद असल्यामुळे दैनंदिन अपघाताच्या घटना घडत असून या रस्त्यावर काही जणांचे मृत्यू व अनेक जण गंभीर जखमी झाले असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याकडे स्थानिक प्रशासनाचे दुर्लक्ष होत असून याठिकाणी होणारे अपघात रोखण्यासाठी तसेच सदर मार्गावर तातडीने गतिरोधक तयार करावेत यानुषंगाने शासनाने कोणती तातडीची कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (०४-०७-२०२५) :** (१) हे खरे नाही,

छत्रपती संभाजीनगर-मंठा-(तळणी फाटा)-बसमत हा राष्ट्रीय महामार्ग क्र.७५२-आय असून राष्ट्रीय महामार्ग (सा.बां.) विभागाकडे आहे. पोलीस ठाणे, मंठा, जि.जालना यांचे अहवालानुसार चौफुली (मंठा चौक) ते तळणी फाटा दरम्यान गंभीर अपघात किंवा अपघातामुळे मृत्यू झाल्याची कोणतीही नोंद नाही.

(२) पोलीस ठाणे, मंठा, जि.जालना यांचे दिनांक ०२/०६/२०२५ चे अहवालानुसार नमूद स्थळी भविष्यात होऊ शकणारे अपघात रोखण्यासाठी रंबलर स्ट्रिप्स व रस्ता सुरक्षिततेचे उपाय करण्यात येत आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जेष्ठ नागरिकांसाठी नवीन गृहनिर्माण धोरण राबविण्याबाबत

**(११) १७३३ (१७-०४-२०२५) श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनातर्फे तयार करण्यात आलेल्या नवीन गृहनिर्माण धोरणांमध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी वेगळे धोरण राबविण्यात येणार असल्याची घोषणा मा.उप मुख्यमंत्री, यांनी माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान केली असून त्याप्रमाणे पुढील आराखडा शासनाकडून करण्यात आला असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई झोपडपट्टी मुक्त करण्यासाठी प्रलंबित प्रकल्प तातडीने पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०३-०७-२०२५) :** (१) हे खरे आहे.

या विभागाचे "राज्य गृहनिर्माण धोरण - २०२५" ला मा.मंत्रिमंडळ स्तरावरुन मान्यता मिळालेली असून सदर धोरणामध्ये ज्येष्ठ नागरीकांसाठी नवीन गृहनिर्माण धोरणाची बाब समाविष्ट करण्यात आली आहे.
(२) मुंबई झोपडपट्टीमुक्त करण्याच्या उदात्त हेतूने महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ मधील तरतुदीनुसार रखडलेल्या / प्रलंबित प्रकल्पांसाठी पुढीलप्रमाणे योजना राबविण्यात येत आहे.

१ मुंबई झोपडपट्टी मुक्त करण्यासाठी रखडलेले / प्रलंबित प्रकल्प पूर्ण करणेबाबत या विभागाचा दिनांक २१/०५/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये अभय योजना (Amnesty Scheme) राबविण्यास तसेच, झोपडपट्टी प्राधिकरणास निविदा प्रक्रियेने विकासकाची नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

२ तसेच, रखडलेल्या / प्रलंबित प्रकल्प BMC, MSRDC, MMRDA, MCGM CIDCO, MHADA, MIDC, MAHAPRIT, MAHAHOUSING इ. शासकीय / निमशासकीय महामंडळे / प्राधिकरणे / स्थानिक स्वराज्य संस्था यांचेमार्फत संयुक्त भागीदारी तत्वावर (Joint Venture) राबविण्यास या विभागाच्या दिनांक २१/०९/२०२३ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात आदिवासीच्या 'सबळीकरण व स्वाभिमान योजने' स भरीव निधी उपलब्ध करून देण्याबाबत

**(१२) १८१५ (१४-०४-२०२५) श्री.सुनिल शिंदे, श्री.मिलिंद नार्वेकर :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात भूमिहीन आदिवासी कुटुंबियांना उदरनिर्वाहसाठी हक्काची शेती मिळावी, यासाठी राज्यात 'सबळीकरण व स्वाभिमान योजना' राबविण्यात आली असली तरी गत २० वर्षात या योजनेसाठी शासनाने केवळ दोनदाच निधी दिला असल्याची बाब दिनांक २ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू योजनेसाठी शासनाकडून निधी मिळत नसल्याने सदर योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी होत नसल्याने आदिवासीच्या सबळीकरणावर त्याचा विपरीत परिणाम झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात आदिवासीच्या 'सबळीकरण व स्वाभिमान योजने' स भरीव निधी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.डॉ. अशोक उईके (०७-०७-२०२५) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

आदिवासी विकास विभागाकडून भूमिहिन दारिद्र्यरेषेखालील आदिवासींचे सबळीकरण व स्वाभिमान योजना दिनांक २४/०२/२००४ रोजीच्या शासन निर्णयान्वये राबविण्यात येत आहे.सदर योजनेमध्ये दिनांक ०४/०२/२०१० व दिनांक २८/०७/२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये बदल करून सुधारित मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. सद्य:स्थितीत सदर योजनेची अंमलबजावणी ही दिनांक २८/०७/२०२१ रोजीच्या शासन निर्णयानुसार करण्यात येत आहे.सदर योजना जिल्हा आदिवासी घटक कार्यक्रमाखाली राबविण्यात येते. या योजनेंतर्गत सन २००४-०५ ते सन २०२४-२५ मधील खर्च व साध्य याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | अपर आयुक्त, आदिवासी विकास | सन २००४-०५ ते सन २०२४-२५ प्राप्त तरतुद व खर्च तपशिल | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | तरतुद | खर्च (रुपये लक्ष) | लक्षांक | साध्य |
| १ | ठाणे | १९२०.४६ | १०५०.१७२२ | १५२ | ८९ |
| २ | नाशिक | ३६२१.३८ | १९३३.१२ | ६६७ | ६६७ |
| ३ | अमरावती | ४६२०.४५ | २०३२.१ | २७४ | १८२ |
| ४ | नागपूर | ४०१.५९ | १९४.१८ | ७५ | ७४ |
| | एकूण | १०५६३.८८ | ५२०९.५७२२ | ११६८ | १०१२ |

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (सीसीआय) च्या मुंबईतील पथकाकडून कापूस खरेदी केंद्रावर आकस्मिक भेटी दिल्या जात असल्याबाबत

**(१३) १९४५ (२४-०४-२०२५) श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (सीसीआय) च्या माध्यमातून देशभरात हमीभावानुसार कापसाची खरेदी केली जात असून कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडियाच्या अंदाजानुसार कापसाचा भाव वाढण्याची शक्यता असल्याने कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी कापूस विक्रीकरीता न आणता तसाच साठवून ठेवला असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, “सीसीआय”च्या हमीभावापेक्षा जास्त भाव मिळाल्यास शासकीय कापूस खरेदी प्रक्रियेतील शेतकऱ्यांचा सहभाग कमी होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०२४ मध्ये १२७ कापूस खरेदी केंद्रे सुरु केली असून शेतकऱ्यांना नजिकच्या केंद्रावर कापूस विक्री करण्याची सुविधा देण्यात आली असून कापूस खरेदी केंद्राच्या कार्यप्रणाली मध्ये पारदर्शकता आणण्याबाबत सीसीआयच्या मुंबईतील पथकाकडून कापूस खरेदी केंद्रावर आकस्मिक भेट दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी आर्थिक सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी कर्ज आणि अनुदान योजनेसाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय सावकारे (०७-०७-२०२५) :** (१) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) होय, हे खरे आहे.
(४) कृषी विभागाच्या दिनांक २९ जुलै, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये कापूस उत्पादक शेतकऱ्यांना ०.२ हेक्टरपेक्षा कमी क्षेत्रासाठी सरसकट रुपये १००० तर ०.२ हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रासाठी, २ हेक्टरच्या मर्यादेत प्रती हेक्टर रुपये ५,००० अर्थ सहाय्य मंजूर करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्ह्यातील शालेय पोषण आहार कामगारांच्या विविध मागण्याबाबत

**(१४) २०९८ (२४-०४-२०२५) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शालेय पोषण आहार कामगारांच्या विविध मागण्या तात्काळ मान्य कराव्यात, या मागणीसाठी कोल्हापूर जिल्हा शालेय पोषण आहार कामगार संघटनेच्या वतीने जिल्हा परिषदेवर दिनांक १७ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान मोर्चा काढण्यात आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त कामगारांच्या मागण्या पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०४-०७-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) संबंधित संघटनेच्या निवेदनाच्या अनुषंगाने शिक्षणाधिकारी (प्राथ.), जिल्हा परिषद, कोल्हापूर यांच्या स्तरावरुन बैठक घेण्यात आली आहे. तसेच, निवेदनातील मागणीच्या अनुषंगाने नियमानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पालघर जिल्ह्यातील जलजीवन मिशनअंतर्गत पाणीपुरवठा योजनांची कामे प्रलंबित असल्याबाबत

**(१५) २१९७ (२४-०४-२०२५) अॅड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यात महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा विभागामार्फत पालघर शहरासह डहाणू - ११३ गावे, तलासरी- ३६ गावे, जव्हार - १९० गावे, मोखाडा - ५६ गावे,

पालघर - ७८ गावे, वसई-२२ गावे, वाडा- १४७ गावे आणि विक्रमगड- ८२ गावे असे मिळून ७२४ गावांना रुपये ९४१ कोटी ३४ लाख ५९ हजार इतक्या खर्चाची हर घर नल से जल योजना राबविण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास सदर कामे जलदगतीने पूर्ण करण्याबाबत शासन स्तरावर आदेश देण्यात येऊनही सदरहू कामे अपूर्ण अवस्थेत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर हर घर नल से जल योजनेची उक्त कामे पूर्ण करून पालघर जिल्ह्यातील उक्त ७२४ गावांना पाणी पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच तसेच सदर कामे अपूर्ण ठेवणा ऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील (०४-०७-२०२५) :** (१) पालघर जिल्ह्यात जल जीवन मिशन अंतर्गत जिल्हा परिषदेमार्फत डहाणू-११३, जव्हार-७९, मोखाडा-५६, पालघर-७८, तलासरी ३६, वसई-२२, विक्रमगड-८२ व वाडा-१४७ अशा एकूण ६१३ गांवाकरीता रुपये ९३७.७० कोटीच्या ५६३ योजना राबविण्यात येत आहेत.

तर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत डहाणू-६१, जव्हार-२८, मोखाडा-५६, पालघर-१३१, तलासरी ५, वसई-२७, विक्रमगड-११ व वाडा-२० अशा एकूण ३३९ गांवाकरीता रुपये ११७१.२५ कोटीच्या २६ योजना राबविण्यात येत आहेत.
(२) हे अंशतः खरे आहे.

जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येत असलेल्या एकूण ५६३ नळ पाणीपुरवठा योजनांपैकी १८३ नळ पाणीपुरवठा योजनांची कामे १००% भौतिकदृष्ट्या पूर्ण झालेली असून, उर्वरीत ३७९ नळ पाणीपुरवठा योजनांची कामे विविध टप्प्यांवर प्रगतीपथावर आहेत.

तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राबविण्यात येत असलेल्या २६ प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनांपैकी १ योजनेची कामे १००% भौतिकदृष्ट्या पूर्ण झालेली असून, उर्वरीत २५ नळ पाणीपुरवठा योजनांची कामे विविध टप्प्यांवर प्रगतीपथावर आहेत. त्यापैकी ०२ योजना (मोखाडा तालुका ५८ प्रादेशिक पाणीपुरवठा व अर्नाळा व १६ गांवे प्रादेशिक पाणीपुरवठा) अंशत: कार्यान्वित झालेल्या आहेत.
(३) सदर योजनांची अंमलबजावणी करतांना वन खाते, रेल्वे, राष्ट्रीय महामार्ग इत्यादी विविध खात्यांच्या परवानगी प्राप्त करण्यास तसेच योजनांच्या उपांगासाठी आवश्यक खाजगी जागा उपलब्ध करून घेण्यासाठी कालावधी लागलेला आहे. त्यामुळे योजना पूर्ण करण्यास विलंब झालेला आहे. मात्र ज्या योजनांमधील उपांगाची कामे विहित मुदतीत पूर्ण करण्यास विलंब झालेला आहे अशा योजनांच्या ठेकेदारांवर दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे. योजनांची कामे विहित मुदतीत पूर्ण करण्याच्या दृष्टीने कार्यवाही चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जालना जिल्ह्यातील सूक्ष्मसिंचन घोटाळयामध्ये दोषी अधिकारी/ कर्मचारी यांचे विरुध्द कारवाई न करणाऱ्या कृषी सहसंचालकांची चौकशी करुन कायदेशीर कारवाई करण्याबाबत

**(१६) ११९३९ (०४-०८-२०२३) श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्ह्यातील सर्वच तालुक्यात सूक्ष्मसिंचन गैरव्यवहारामध्ये दोषी असलेल्या अधिकारी, कर्मचारी तसेच दोषींना वाचविणाऱ्या कृषी सहसंचालक यांच्याविरुध्द खातेनिहाय चौकशी करुन दोषीविरुध्द कायदेशीर कारवाई करण्याबाबत मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक २८ मे,२०२३ रोजी वा त्यादरम्यान स्थानिक लोकप्रतिनिधींनी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने याप्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे (०७-०४-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

उपाध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटी (पर्यावरण विभाग) यांनी दिनांक १८ मे, २०२३ रोजी मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांना निवेदन दिले आहे.

(२) सदर प्रकरणी विभागीय कृषी सहसंचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांच्या दिनांक २३/११/२०२०, दिनांक ०४/१२/२०२०, दिनांक १५/१२/२०२० व दिनांक ०४/०३/२०२१ च्या आदेशान्वये एकूण ४ कृषी पर्यवेक्षक व १ कृषी सहाय्यक यांना निलंबित करण्यात आले.

तत्कालीन कृषी पर्यवेक्षक, हसनाबाद व २ वितरक यांच्याविरुध्द पोलीस स्टेशन पारध, जि.जालना येथे दिनांक २१/०१/२०२१ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

विभागीय कृषी सहसंचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांनी तत्कालीन कृषी सहाय्यक तथा प्रभारी कृषी पर्यवेक्षक, जाफ्राबाद यांच्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम १० खाली चौकशी सुरु करुन त्यांच्यावर एक वेतनवाढ पुढील वेतन वाढीवर परिणाम न करता रोखण्याची शिक्षा दिनांक ०१/०१/२०२१ अन्वये बजाविली आहे.

सदर प्रकरणी ७ अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील नियम - ८/१२ नुसार दिनांक १४/०३/२०२२ च्या आदेशान्वये विभागीय चौकशी सुरु करण्यात आली. त्यापैकी १ अपचारी यांचे निधन झाल्याने त्यांच्याविरुध्दची विभागीय चौकशी संपुष्टात आणण्यात आली. उर्वरित ६ अपचारी यांच्यावर ठेवण्यात आलेले दोषारोप सिध्द होत नसल्याचे निष्कर्ष चौकशी अधिकारी यांनी नोंदविल्याने, दिनांक ०६/०२/२०२५ च्या शासन आदेशान्वये त्यांना दोषमुक्त करण्यात आले.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लातूर जिल्ह्यातील पशुसंवर्धन विभागामार्फत अनेक पदांची भरती करण्याबाबत

**(१७) २२१९८ (०३-०१-२०२४) श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातुर जिल्ह्यातील पशुसंवर्धन विभागातील पदे रिक्त असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामध्ये पशुधन विकास अधिकारी, पशुधन पर्यवेक्षक, लिपिक, व्रणोपचारक व परिचर यासारखी महत्त्वाची पदे रिक्त असल्याने पशुपालकांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रिक्त पदे भरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०६-२०२५) : (**१) व (२) अंशतः खरे आहे.

(३) शासन आदेश दिनांक २१/०२/२०२४ व दिनांक ०४/०३/२०२४ अन्वये एकूण २८९ पशुधन विकास अधिकाऱ्यांची सरळसेवेने नियुक्ती करण्यात आली आहे. पशुधन पर्यवेक्षकांची २५९ पदे आयुक्त पशुसंवर्धन यांच्या स्तरावरून भरण्यात आली आहेत.

याशिवाय राज्यातील पशुधन विकास अधिकारी (गट-अ) संवर्गाची २७९५ रिक्त पदे भरण्यासाठी तसेच सहायक आयुक्त पशुसंवर्धन संवर्गाची ३११ रिक्त पदे भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने जाहिराती प्रसिध्द केल्या आहेत. तसेच वर्ग ३ ची पदे भरण्यासाठी सदर पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेत आणण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) विलंब नाही.

---

## राज्यातील ११ जिल्हा कृषी हवामान केंद्रे बंद केल्याबाबत

**(१८) २३१६२ (१८-०७-२०२४) श्री.सचिन अहिर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रीय हवामान खात्याने शेतकऱ्यांना हवामान तसेच इतर कृषी सल्ला मिळावा यासाठी राज्यात सुरू केलेली ११ जिल्हा हवामान केंद्रे बंद करण्याचा दिनांक १७ जानेवारी, २०२४ रोजी वा त्यासुमारास आदेश काढला असल्यामुळे कोल्हापूर जिल्ह्यातील प्रादेशिक हवामान केंद्र ही बंद होणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त हवामान केंद्रें बंद करण्याची कारणे काय आहेत

(३) असल्यास सदर हवामान केंद्रे बंद न करता सुरु राहण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा केला आहे काय,असल्यास याप्रकरणी सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(४) तसेच शेतकऱ्यांना हवामानाबद्दल अचूक माहिती व कृषी सल्ला मिळावा याबाबत कोणती पर्यायी व्यवस्था केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलांबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे (०७-०७-२०२५) :** (१), (२), (३) व (४) जिल्हा हवामान केंद्र ही बाब भारतीय हवामान खात्याशी संबंधित असून त्या संदर्भातील निर्णय भारतीय हवामान खात्याद्वारे घेण्यात येतात.

शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग दिनांक ०८/०३/२०१७ अन्वये राज्यात महावेध प्रकल्प राबविण्यात येत आहे. सदर प्रकल्पांतर्गत राज्यात महसूल मंडळ स्तरावर स्वयंचलित हवामान केंद्रांची स्थापना करण्यात आली आहे. या हवामान केंद्रांद्वारे प्राप्त माहितीचा वापर शेतकरी योजनांसाठी केला जातो. तसेच केंद्र शासनाच्या कृषी हवामान सल्लागार सेवांमार्फत शेतकऱ्यांना हवामान विषयक सल्ला देण्यात येतो.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## केलवड (ता.राहाता, जि.अहमदनगर) पशुवैद्यकीय दवाखान्यात पूर्ण वेळ पशुवैद्यकीय अधिकारी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१९) २४३१६ (०८-०८-२०२४) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केलवड (ता.राहाता, जि.अहमदनगर) पशुवैद्यकीय दवाखान्यातील वैद्यकीय अधिकारी दीर्घकाळ रजेवर असल्यामुळे प्रभारी पशुवैद्यकीय अधिकारी, शिर्डी यांच्याकडे इतरही दवाखान्यांचा अतिरिक्त कार्यभार असल्याने त्यांना केलवड येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात उपस्थित राहता येत नसल्यामुळे तेथील जनावरांना उपचार मिळत नसल्याची बाब माहे एप्रिल,२०२४ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पशुपालक यांच्या मागणीनुसार केलवड पशुवैद्यकीय दवाखान्यात पूर्ण वेळ पशुवैद्यकीय अधिकारी उपलब्ध करून देण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०६-२०२५) :** (१) व (२) पशुवैद्यकीय दवाखाना केलवड, येथील नियमित नियुक्त पशुधन विकास अधिकारी, हे रस्ते अपघातात गंभीर जखमी झाल्याने वैद्यकीय रजेवर होते. त्यांच्या रजा कालावधीत अन्य पशुधन विकास अधिकाऱ्याकडे कार्यभार सोपविण्यात आला होता.त्यांच्यामार्फत पशुपालकांना नियमित सेवा उपलब्ध करुन देण्यात येत होत्या. नियमित नियुक्त अधिकारी दिनांक १६/०५/२०२४ रोजी पुनःश्च विभागात रुजू झाले आहेत.

(३) विलंब नाही.

---

## यवतमाळ जिल्ह्यातील पुसद पाटबंधारे विभागांतर्गत अमडापूर धरणाच्या कालव्यासाठी जमिनी दिलेल्या शेतकऱ्यांना सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याबाबत

**(२०) २४३४७ (२२-०७-२०२४) श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमडापूर (जि.यवतमाळ) येथीन धरणाच्या कामाला सन २००७-०८ मध्ये सुरुवात झालानंतर अनेक कालव्याची कामे पाटबंधारे विभागाने पूर्ण केली असून कालव्यासाठी शेतकऱ्यांनी जमिनी दिल्या असूनही तेथील शेतकरी सोयीसुविधांपासून वंचित असल्याचे माहे मे, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अमडापूर धरणाचा कालवा नंबर सात येथील शेतकऱ्यांना शेतात ये-जा करण्यासाठी आवश्यक असणारे रस्ते व पूल नसल्याने सोळा वर्षानंतरही या कालव्याची कामे प्रलंबित असल्याने शेतकऱ्यांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन शेतकऱ्यांना सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१२-०६-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.

सदर प्रकल्पाचे बांधकाम सन १९९६ मध्ये सुरूवात होऊन माहे जून-२००५ मध्ये धरणाची घळभरणी झाली आहे. सन २००६ मध्ये १४.८३ द.ल.घ.मी. प्रकल्पीय पाणीसाठा निर्मित झाला आहे, सदर प्रकल्पाची एकूण सिंचन क्षमता ही १७३७ हे. असून सन २०२३-२४ मध्ये १०८३ हे. क्षेत्र सिंचन करण्यात आले आहे, प्रकल्प बळीराज जलसंजीवनी (BJSY) योजनेत समाविष्ठ करण्यात येवून सिंचन निर्मितीची उर्वरीत कामे करण्यात आली आहेत व अनुषंगीक बांधकामे प्रगतीपथावर आहेत. सदर बांधकामे माहे जून, २०२५ पर्यंत पूर्ण करून उर्वरीत सिंचन क्षेत्रास लाभ देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.
(२) अंशत: खरे आहे.

मुख्य कालव्यावरील लघुपाट क्र. ७ हा ३३३० मी. लांबीचा असून त्यापैकी सा.क्र. ० ते २७९० मी. या लांबीत कालव्याचे काम झाले आहे व शेतकऱ्यांना शेतात ये-जा करण्यासाठी आवश्यक असणारे रस्ते व पूल उपलब्ध करून देण्यात आले आहे, तसेच उर्वरीत सा. क्र.२७९० मी. ते ३३३० मी. मधील एकूण ७ शेतकऱ्यांचा भुसंपादनास विरोध असल्याने २.३२ हे. आर जमिनीचे सक्तीचे भुसंपादन कार्यवाही भुसंपादन अधिकारी यांचे मार्फत सुरू असून सदर जमीन संपादीत करुन माहे जून, २०२५ पर्यंत पूर्ण करून उर्वरीत कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(३) भुसंपादनास विरोध असलेल्या क्षेत्राची सक्तीचे भुसंपादन कार्यवाही भुसंपादन अधिकारी यांचे मार्फत सुरू असून सदर जमीन संपादीत करुन माहे जून, २०२५ पर्यंत पूर्ण करून उर्वरीत कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** 
**मुंबई.**

**विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.